( इंग्रजीमध्ये टंकलेखित केलेल्या न्याय निर्णयाचे मराठीमध्ये भाषांतर )

रजनीकांत

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य

३० सप्टेंबर १९७०

**[एस. एम. सिक्री, के. एस. हेगडे आणि आय. डी. दुआ, जे. जे.]**

अपील – भा. द. वि. कलम ३२६ आणि ३२४ अंतर्गत – उच्च न्यायालयाने कोणतेही कारण न देता अपील सारांशतः अमान्य केले -इच्छित मार्ग असल्यास - घटनेच्या अनुच्छेद १३६ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाला त्याच्या अधिकाराचा योग्य वापर करण्यास सक्षम करण्यासाठी कारणमिंमासा देण्याची आवश्यकता.

एका व्यक्तीला धोकादायक शस्त्राने स्वेच्छेने गंभीर दुखापत केल्याबद्दल आणि इतर तीन व्यक्तींना दुखापत केल्याबद्दल अपीलकर्त्याला न्यायचौकशी न्यायालयाने भा. द. वि. कलम ३२६ आणि ३२४ अंतर्गत गुन्ह्यांसाठी दोषी ठरवले होते. कलम ३२६ अंतर्गत त्याच्या दोषसिद्धीसाठी त्याला चार वर्षांच्या कारावासाची आणि कलम ३२४ अंतर्गत तीन गुन्ह्यांपैकी प्रत्येकासाठी १ १/२ वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली, सर्व शिक्षा एकाच वेळी भोगवायच्या आहेत. अपीलकर्त्याने त्याच्या दोषसिद्धीच्या विरोधात मुंबई येथील उच्च न्यायालयात याचिका दाखल केली परंतु त्याची याचिका न्यायालयाने “फेटाळली” या एका शब्दात फेटाळून लावली.

अनुच्छेद १६५ अंतर्गत विशेष अनुमतीद्वारे या न्यायालयात केलेल्या अपीलात, अपीलकर्त्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला होता की ज्या बाबत तक्रार केली होती त्या दुखापती त्याने त्याच्या स्वसंरक्षणासाठीच्या कायदेशीर आणि वैध अधिकाराचा वापर करून केल्या होत्या. असा ही युक्तिवाद करण्यात आला की, न्यायचौकशी न्यायालयातील तीन

साक्षीदारांच्या केस वर्ग करणाऱ्या न्यायालयासमोर केलेल्या जबाबांवर ज्यांच्यापासून ते न्याय चौकशीमध्ये परावृत्त झाले ते न्यायचौकशी न्यायालयाने फिर्यादीच्या बाजूच्या समर्थनार्थ ठरवायला नको होती; मात्र दोषी न्यायालयातील वक्तव्यापासून माघार न घेणारा एकमेव साक्षीदार अत्यंत भीतीदायक साक्षीदार होता, कारण तो 'ती व्यक्ती' होती ज्यावर अपीलकर्त्याने दुखापत केली असल्याचे म्हटले होते; म्हणून त्याचा पुरावा पूर्णपणे स्वीकारला जायला नको होता.

निर्णय: अपील फेटाळले,

(१) अपीलकर्ते यांनी केलेली याचना पुराव्यावर टिकाव धरू शकत नाही. तीन साक्षीदारांनी खटला वर्ग करणाऱ्या न्यायालयासमोर दिलेल्या जबाबांपासून ते न्यायचौकशीमध्ये परावृत्त झाले आणि हि बाब न्यायचौकशी न्यायालयाच्या अभिलेखावर फौ. प्र. सं. च्या कलम २८८ द्वारे रीतसर आणली. ज्यामुळे स्वतंत्र पुरावा तयार झाला आणि न्यायालयाचे समाधान झाले की ते जबाब खरे होते तर न्यायचौकशी न्यायालयात दिलेले जबाब खोटे होते तर आरोपीला दोषी ठरवण्यासाठी पूर्वीच्या जबाबावर सुरक्षितपणे अवलंबून रहावे लागेल. या प्रकरणात खटल्यातील जबाबांचे निव्वळ वाचन त्यांच्या अविश्वसनीय स्वरूपाचे दर्शन घडवते आणि साक्षीदारांनी त्यांच्या पूर्वीच्या जबाबांपासून परावृत्त होणे हे काही दुराचारी उद्दिष्ट होते हे स्पष्ट दिसते. त्यामुळे, भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६ आणि ३२४ अंतर्गत गुन्ह्यांसाठी आरोपीला दोषी ठरविण्यात न्यायचौकशी न्यायालयाने बरोबर केले आहे यावर आम्ही समाधानी आहोत.

[५३६ ब – ड]

(२) अतिरिक्त सत्र न्यायाधीशांचा न्यायनिर्णय आणि उच्च न्यायालयात दाखल केलेले अपीलाच्या कारणांचे ज्ञापन वाचल्यानंतर आम्हाला असे वाटले की उच्च न्यायालयाने फक्त "फेटाळले" या शब्दाची नोंद करून अंडी त्यावर न्यायालयाचे मत व्यक्त न करता अपील फेटाळणे योग्य नव्हते.

या न्यायालयाने वारंवार नमूद केले आहे की, जेव्हा फौजदारी प्रक्रिया संहितेअंतर्गत उच्च न्यायालयात अपीलात काही वादग्रस्त मुद्दे उपस्थित केले जातात तेव्हा त्या मुद्द्यांना नाकारताना उच्च न्यायालयाने आपल्या मताचे काही कारण दिले तर योग्य होईल. उच्च न्यायालयाच्या मताचा विचार न घेता या न्यायालयाला विशेष अनुमतीद्वारे मान्य अपीलात त्या मुद्द्यांवर विचार करताना अडचण येणे स्वाभाविक आहे. (५३० ह – ५३१ क)

[मुश्ताक हुसैन विरुद्ध महाराष्ट्र राज्य (१९५३ एस्. सी. आर. ८०९) आणि चल्लप्पा रामास्वामी विरुद्ध महाराष्ट्र राज्य (१९७० (२) एस्. सी. आर. ४२६) यांचा संदर्भ दिला]

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४१० अंतर्गत, सत्र न्यायाधीश किंवा अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांच्याकडून झालेल्या खटल्यात दोषी ठरलेल्या व्यक्तीस उच्च न्यायालयात अपील करण्याचा अधिकार देते. हा अधिकार व्यथित झालेल्या पक्षाला तथ्यांच्या निष्कर्षांना आव्हान देण्याचा आणि पुराव्याच्या पुनर्मूल्यांकन करण्यासाठीचा अधिकार देतो. म्हणूनच, उच्च न्यायालयांनी तथ्य किंवा कायद्यावर वादग्रस्त मुद्दे उपस्थित करणाऱ्या प्रकरणांमध्ये अनुच्छेद १३६ अंतर्गत आपले अधिकार समाधानकारकपणे वापरण्यास या न्यायालयाला सक्षम करण्यासाठी त्यांचे बहुमूल्य मत या न्यायालयाला देऊन या प्रकरणांमध्ये अंतिम निर्णय देण्याची प्रथा पाळली तर ते न्यायदानाच्या दृष्टिकोनातून उपयुक्त ठरेल. उच्च न्यायालयाचा समाधानकारक आदेश नसल्यास या न्यायालयाला संबंधित आरोपींना अनावश्यक हैराण न करण्यासाठी आणि गुन्हेगारी प्रकरणांच्या अंतिम निकालात विलंब होऊ नये म्हणून पुनःसुनावणीसाठी आणि त्यांच्या निष्कर्षांची कारणे नोंदवण्यासाठी प्रकरणे उच्च न्यायालयात परत पाठवावी लागू शकतात. या प्रकरणात, हा एक मार्ग आहे जो हे न्यायालय अनुच्छेद १३६ अंतर्गत अपीलात सामान्यपणे अवलंबताना नाखुश असतात, खटल्याच्या निकालात अधिक विलंब टाळण्यासाठी आम्ही स्वतः पुराव्याचा विचार करण्याचा निर्णय घेतला कारण यांत वादग्रस्त मुद्दे आहेत. (५३१ ड – फ)

(३) हे न्यायालय सामान्यतः अनुच्छेद १३६ अंतर्गत अपीलवरील शिक्षेच्या प्रमाणात हस्तक्षेप करीत नाही, परंतु या प्रकरणात, उच्च न्यायालयाने आमच्या मते, कारण न देता अपील सारांशात फेटाळले असल्याने, आम्ही सर्व संबंधित परिस्थितींचा विचार करून स्वतः हा प्रश्न हाताळण्यासाठी योग्य प्रकरण आहे. (न्यायालयाने असे म्हटले की दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा न्यायाच्या उद्दिष्टांची पूर्तता करेल). (५३६ ई)

फौजदारी अपिलीय अधिकारीता फौजदारी अपील क्रमांक ९९/ १९६८

मुंबई उच्च न्यायालयाच्या फौजदारी अपील क्र. ३८०/१९६८ मधील २८ मार्च १९६८ च्या आदेशाविरुद्ध विशेष अनुमतीद्वारे अपील.

व्ही. एम. तारकुंडे, एन. एच. हिंगोरानी आणि के. हिंगोरानी - अपीलकर्त्यासाठी.

एम. सी. भंडारे आणि एस. पी. नायर - उत्तरवादीसाठी.

न्यायालयाचा न्यायनिर्णय न्या. दुआ यांनी पारीत केला

हे मुंबई उच्च न्यायालयाच्या २८ मार्च १९६८ च्या निकालाविरुद्ध विशेष अनुमतीद्वारे दाखल केलेले अपील आहे, जे अतिरिक्त सत्र न्यायाधीश, ग्रेटर मुंबई यांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६ आणि ३२४ अंतर्गत गुन्ह्यांसाठी दोषी ठरवल्याबद्दल अपीलकर्त्याचे अपील सारांशात फेटाळले आहे, त्या विरोधात आहे. उच्च न्यायालयाने त्याचे अपील एका शब्दात 'फेटाळले' अशी नोंद करून फेटाळले आहे.

प्रारंभापासूनच आम्हाला याकडे निर्देश करावा लागेल की, अतिरिक्त सत्र न्यायाधीशांचा निकाल आणि उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपीलाच्या कारणांचे ज्ञापन यांचे अवलोकन केल्यानंतर आम्हाला असे वाटले की उच्च न्यायालयाने अपीलावर आपले मत व्यक्त न करता ते

एका शब्दात “फेटाळले” असे नमूद करून अपील फेटाळणे बरोबर नव्हते आणि म्हणून अपील स्पष्टपणे वादग्रस्त आहे असे आम्हाला वाटते. या न्यायालयाने वारंवार नमूद केले आहे की, जेव्हा फौजदारी प्रक्रिया संहितेअंतर्गत उच्च न्यायालयात अपीलात काही वादग्रस्त मुद्दे उपस्थित केले जातात तेव्हा त्या मुद्द्यांना नाकारताना उच्च न्यायालयाने आपल्या मताचे काही कारण दिले तर चांगले होईल. उच्च न्यायालयाच्या मताचा विचार न घेता या न्यायालयाला विशेष अनुमतीद्वारे मान्य अपीलात त्या मुद्द्यांवर विचार करताना अडचण येणे स्वाभाविक आहे. [मुश्ताक हुसैन विरुद्ध महाराष्ट्र राज्य (१९५३ एस्. सी. आर. ८०९) आणि चल्लप्पा रामास्वामी विरुद्ध महाराष्ट्र राज्य (१९७०

(२) एस्. सी. आर. ४२६) पहा]. आम्ही पुन्हा एकदा जोर देऊन सांगू इच्छितो की, घटनेचा अनुच्छेद १३६ च्या तरतुदी उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या पक्षकाराला अपील करण्याचा अधिकार देत नाही: तर तो या न्यायालयाला योग्य प्रकरणांमध्ये हस्तक्षेप करण्याची केवळ स्वेच्छाधिकार देतो. या अधिकाराच्या धोरणी वापरासाठी, या न्यायालयाला अपील सारांशात फेटाळताना उच्च न्यायालयांनी समाधानकारक आदेश नोंदवण्याची अपेक्षा आहे. हे नोंदवणे योग्य आहे की, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४१० अंतर्गत, सत्र न्यायाधीश किंवा अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांच्याकडून न्यायचौकशी झालेल्या खटल्यात दोषी ठरलेल्या व्यक्तीस उच्च न्यायालयात अपील करण्याचा अधिकार देते. हा अधिकार व्यथित झालेल्या पक्षाला तथ्यांच्या निष्कर्षांना आव्हान देण्याचा आणि पुराव्याच्या पुनर्मूल्यांकन करण्यासाठीचा अधिकार देतो. म्हणूनच, उच्च न्यायालयांनी तथ्य किंवा कायद्यावर वादग्रस्त मुद्दे उपस्थित करणाऱ्या प्रकरणांमध्ये अनुच्छेद १३६ अंतर्गत आपले अधिकार समाधानकारकपणे वापरण्यास या न्यायालयाला सक्षम करण्यासाठी त्यांची बहुमूल्य करणीमिमांसा या न्यायालयाला देऊन या प्रकरणांमध्ये अंतिम निर्णय देण्याची प्रथा पाळली तर ते न्यायदानाच्या दृष्टिकोनातून उपयुक्त ठरेल. उच्च न्यायालयाचा समाधानकारक आदेश नसल्यास या न्यायालयाला संबंधित आरोपींना

अनावश्यक हैराण न करण्यासाठी आणि गुन्हेगारी प्रकरणांच्या अंतिम निकालात विलंब होऊ नये म्हणून पुनःसुनावणीसाठी आणि त्यांच्या निष्कर्षांची कारणे नोंदवण्यासाठी प्रकरणे उच्च न्यायालयात परत पाठवावी लागू शकतात. या प्रकरणात, हा एक मार्ग आहे जो या न्यायालयाने अनुच्छेद १३६ अंतर्गत अपीलात सामान्यपणे अवलंबताना नाखुश असतात, खटल्याच्या निकालात अधिक विलंब टाळण्यासाठी आम्ही स्वतः पुराव्याचा विचार करण्याचा निर्णय घेतला कारण यांत प्रथमदर्शनी वादग्रस्त मुद्दे आहेत.

अपीलकर्ता रजनी उर्फ बाल घनश्याम गाडकर याच्यावर २१ जून १९६६ रोजी नामदेव केशव पडते (सरकारी साक्षीदार क्र. – २) यांना चाकूने वार केल्याबद्दल भारतीय दंड संहितेच्या कलम ३०७ अंतर्गत खून करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप होता. पर्यायाने त्याच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६ अंतर्गत सदर पडते यांना धोकादायक शस्त्राने (चाकूने) स्वेच्छेने गंभीर जखम केल्याचा आरोप होता. त्याच्यावर अजून तीन आरोप म्हणजे भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४ अंतर्गत वसंत नारायण शिंदे, प्रमोद दत्तात्रय चव्हाण आणि सुदाम महादेव खानविलकर यांना स्वेच्छेने जखमी केल्याबद्दल होते. न्यायालयाने खून करण्याचा प्रयत्न करण्याचा आरोप सिद्ध न झाल्याने पडते यांना चाकूने मारण्याबद्दल भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६ अंतर्गत आपिलकर्त्याला दोषी ठरवून चार वर्षे कारावासाची शिक्षा दिली. इतर तिघांना जखमी केल्याबद्दल भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४ अंतर्गत त्याला दोषी ठरवून तीनही गुन्ह्यांसाठी प्रत्येकी दीड वर्षे कारावासाची शिक्षा दिली. सर्व शिक्षा एकाच वेळी भोगण्याचे आदेश देण्यात आले.

श्री. तारकुंडे, अपीलकर्त्याचे वकील, न्यायालयाने केलेली पुराव्याची तपासणी चुकीची होती आणि म्हणूनच ती टिकाव धरू शकत नाही हे दाखवण्यासाठी आम्हासमोर संबंधित अभिलेखांचा उल्लेख केला. उच्च न्यायालयाने न्यायचौकशी न्यायालयाच्या अंतिम निष्कर्षांशी सहमत होण्यासाठी ज्या कारणांचा विचार केला त्याबद्दल आम्हाला माहिती नसल्याने त्यांना

पुराव्याचा संदर्भ घेण्याची परवानगी देण्यास आम्हाला भाग पडले. ही घटना २१ जून १९६६ रोजी रात्री ९ वाजता मुंबईतील केरवाडीच्या १० व्या आळीमध्ये घडली आणि नामदेव केशव पडते (सरकारी साक्षीदार क्र. २) यांनी त्याच रात्री १०.३० वाजता लॅमिंग्टन रोड येथील पोलिस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली. या अहवालानुसार, पडते यांचे चुलत भाऊ दत्तात्रय गजानन मोरे (फिर्यादीचा साक्षीदार ८) यांना स्कूटर खरेदी करायची होती आणि त्यासाठी त्यांनी पडते यांच्या परिचयाचे विनोद निंबाळकर (सरकारी साक्षीदार क्र. ३) यांच्याशी संपर्क साधला होता. मोरे यांनी पडते यांना सांगितले की, त्यांनी निंबाळकर यांच्यामार्फत आरोपी रजनीला ५ किंवा ६ हजार रुपयांची रक्कम दिली होती. आरोपीने स्कूटर दिली नाही किंवा पैसेही परत केले नाहीत. पैसे परत करण्यासाठी मोरे यांनी त्यांच्याशी संपर्क साधल्यानंतर त्यांना विविध बहाण्यांवर टोलवले गेले. मोरे यांनी दोन दिवसांपूर्वी पडते यांना निंबळकरांसह रजनीकांतकडे जाऊन पैसे परत घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, २० जून रोजी संध्याकाळी पडते यांनी रंजनीकांतशी त्यांच्या निवासस्थानी संपर्क साधला, परंतु त्यांना सांगण्यात आले की, रजनीकांतनी दुपारी 3 वाजता निंबाळकरांना पैसे परत केले. घटनेच्या दिवशी पडते सुमारे ६ वाजता घरी परतले. ते निंबाळकरांकडे गेले आणि त्यांना सोबत घेऊन ते दोघे आरोपीकडे गेले. आरोपी त्याच्या निवासस्थानी नव्हता परंतु त्याच्या आईकडून रात्री ९ वाजता तो परत येईल असे त्यांना समजले. पडते आणि निंबाळकर त्यानंतर सिक्का नगरमधील निंबाळकरांच्या निवासस्थानी परत गेले. रात्री ८.४५ वाजता जेव्हा पुन्हा ते आरोपीच्या घरी गेले तेव्हा सिक्का नगरमधील राहणारे चव्हाण (सरकारी साक्षीदार क्र. ५) नावाची आणखी एक व्यक्ती त्यांच्यासोबत होती. शिंदे (सरकारी साक्षीदार क्र. ४) जो चव्हाण यांना ओळखत होता तोही रस्त्यात त्यांच्यासोबत सामील झाला. ते सर्व रात्री ९ वाजता आरोपीच्या निवासस्थानी गेले परंतु पुन्हा त्यांना तो तेथे आढळला नाही. इमारतीच्या पहिल्या मजल्यावरून खाली येत असताना त्यांना आरोपी तीन-चार मुलांसोबत आढळला. निंबाळकरांनी त्याला पैसे कधी परत करणार असे विचारले. आरोपीने उत्तर दिले की तो

निंबाळकरांना ओळखत नाही परंतु मोरेसोबत हा प्रश्न सोडवेल. पडते यांच्या मध्यस्थीनंतर आरोपीने त्यांनाही सांगितले की तो त्यांना ओळखत नाही. पडते यांनी आग्रह केला की त्यांची ओळख मोरे यांनी करून दिली होती तेव्हा आरोपीने त्याच्या पँटच्या खिशातून चाकू काढून त्याच्या पोटाच्या डाव्या बाजूला आणि डाव्या हातावर जखम करून त्याला चाकूने वार केला. त्यानंतर आरोपीने शिंदेला चाकू मारला आणि पळून गेला. ही फिर्याद खरेतर जे. जे. रुग्णालयात नोंदवण्यात आली होती जिथे केरवाडीच्या १०व्या लेनमध्ये हल्ला झाल्याची माहिती फोनवरून कळल्यानंतर आर. एम. नाईक, एस. आय. लॅमिंग्टन रोड पोलीस स्टेशन (फिर्यादीचा साक्षीदार १०) आणि बी. एन. पाटील, जी. एस. आय., त्याच पोलीस स्टेशनशी संलग्न (फिर्यादीचा साक्षीदार १२) गेले होते, आणि रुग्णालयात दोन व्यक्तिंना दाखल केले होते. ही माहिती व्ही. पी. रोड पोलीस स्टेशनमधून फोनवर कळवण्यात आली होती जिथे पडते आणि शिंदे यांना त्यांच्या मित्रांनी नेले होते आणि तिथून जखमींना पोलीस कॉन्स्टेबल बाबू परब (सरकारी साक्षीदार क्र. ९) यांनी जीपमधून जे. जे. रुग्णालयात नेले होते. पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवल्यानंतर सरकारी साक्षीदार क्र. १० आणि १२ दोघेही आरोपीच्या निवासस्थानी गेले परंतु तो अनुपस्थित असल्याचे आढळून आले. त्याच्या घरावर नजर ठेवण्यात आली. तथापि, आरोपीला दुसऱ्या दिवशी (२२ जून १९६६) गोरेगाव येथे अटक करण्यात आली आणि त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली नाही. त्याच्या अंगावर काही जखमा होत्या.

या प्रकरणातील एक असामान्य वैशिष्ट्य म्हणजे अभियोक्त्याच्या या खटल्यात फौजदारी न्यायालयात सरकार पक्षाला पाठिंबा देणारे तीन प्रत्यक्षदर्शी साक्षीदार शिंदे (सरकारी साक्षीदार क्र. ४), चव्हाण (सरकारी साक्षीदार क्र. ५) आणि खानविलकर (सरकारी साक्षीदार क्र. ६) यांनी अतिरिक्त सत्र न्यायाधीशांच्या न्यायालयातील खटल्यात त्यांचे विधान बदलले. त्यांना फितूर घोषित करण्यात आले आणि अभियोक्त्याद्वारे त्यांचा उलटतपास करण्यात आला आणि त्यांनी पूर्वीच्या दिलेल्या जबाब त्यांनी नाकारले. निंबाळकर (फिर्यादीचा साक्षीदार ३) यांनासुद्धा

अतिरिक्त सत्र न्यायाधीशांच्या न्यायालयातील खटल्यात साक्षीदार म्हणून पाचारण करण्यात आले तेव्हा त्याने सरकारी पक्षाला पाठिंबा देण्यास नकार दिला. त्याने दिलेले कारण म्हणजे हिंसा आणि हल्ल्याची भीती वाटत असल्याने भांडण सुरू झाल्याबरोबरच त्याने घटनास्थळ सोडले. त्यालाही फितूर घोषित करण्यात आले आणि त्याचा उलटतपास घेण्यात आला . पडते (सरकारी साक्षीदार क्र. २) यांच्या पुराव्याने सरकारी पक्षाला पूर्णपणे पाठिंबा दिला आणि तो ठाम राहिला. सरकारी साक्षीदार क्र. ४, ५ आणि ६ यांनी अभियोगाच्या न्यायालयात दिलेली विधाने दंड प्रक्रिया संहितेच्या कलम २८८ अंतर्गत नोंदवण्यात आली होती. अभियोगाच्या न्यायालयात दिलेल्या त्यांचा जबाब त्यांच्या समोर आणण्यात आला, ज्याची सत्यता त्यांनी खटल्यात नाकारली होती, त्यांनी केवळ इतकेच म्हटले की त्या भागांसह ते कसे नोंदवले गेले ते त्यांना माहित नाही. अभिलेखावरील उपलब्ध पुरावे तपासल्यानंतर न्यायालयाने असा निष्कर्ष काढला की, घटना घडल्याबाबत पडते यांनी दिलेली माहिती पूर्णपणे सिद्ध झाली आहे. किरकोळ मुद्द्यांबाबतची विसंगती साक्षीदाराची विश्वासार्हता प्रभावित करत नाही असे सांगून घटनेबाबतच्या ठळक मुद्यांमुळे अपिलकर्त्यांचा अपराध सिद्ध होतो. संपूर्ण पुराव्याचे मूल्यांकन केल्यानंतर भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६ आणि कलम ३२४ अंतर्गत गुन्ह्यांमध्ये अपीलकर्ता दोषी आढळला. भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६ अंतर्गत त्याला चार वर्षे कारावासाची शिक्षा आणि कलम ३२४ अंतर्गत फिर्यादीचे साक्षीदार शिंदे, चव्हाण आणि खानविलकर यांना केलेल्या जखमांसाठी प्रत्येकी दीड वर्षे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. कारावासाच्या सर्व चार शिक्षा एकाच वेळी भोगण्याच्या आदेश देण्यात आले.

या न्यायालयात आरोपीच्या वतीने त्यांचे विद्वान वकील श्री. तारकुंडे यांनी अत्यंत जोरदार युक्तिवाद केला की, नोंदीवरील पुरावे आणि प्रकरणातील शक्यता दर्शवतात की, पडते (सरकारी साक्षीदार क्र. २) आणि त्याचे सहकारी आक्रमक होते आणि आरोपी फक्त त्याचा बचाव करण्याचा प्रयत्न करत होता. जेव्हा पडते त्याला चाकूने धमकी देऊन हल्ला करायचा होता तेव्हा

त्याने तो चाकू पकडण्याचा प्रयत्न केला. अपिलकर्त्याने दिलेल्या धक्क्यामुळे पडते जखमी झाला असल्याच्या त्याच्या म्हणण्यानुसार, या झटापटीदरम्यान आरोपीने यशस्वीरित्या त्याचा चाकू हिसकावून घेतला. या संदर्भात यावर भर दिला गेला की, पडते आणि त्याचे सहकारी निश्चितपणे सहा जणांच्या संख्येत होते आणि एकटा असलेला आरोपी त्यांच्याशी संघर्ष करण्याचा धोका घेऊ शकतच नव्हता. दुसऱ्या बाजूने असे सुचवण्यात आले की, आरोपीकडे त्याचा स्वतःचा चाकू होता, तरी त्याला प्रथम पडते (सरकारी साक्षीदार क्र. २) ने त्याच्या छत्रीने मारले होते आणि त्यानंतर आरोपीने स्वतःचा बचाव करण्यासाठी चाकूचा वार केला. आता हे अपिलकर्त्याने दंड प्रक्रिया संहितेच्या कलम ३४२ अंतर्गत दिलेल्या जबाबात म्हंटले नव्हते, परंतु त्याच्या वकीलाने असा युक्तिवाद केला की, या बचावाला आधार देण्यासाठी अभियोगाच्या पुराव्यावर अवलंबून राहणे त्याच्यासाठी खुले होते. यासाठी त्याने पडते यांच्या पुराव्यावर भर दिला, ज्यामध्ये त्याने अपीलकर्त्याने चाकूचा वार केल्यानंतर त्याने त्याला त्याच्या छत्रीने ढकलण्याचा प्रयत्न केला होता हे कबूल केले होते. पडतेने त्याच्याकडून छत्रीचा वापर केल्याचे योग्यच कबूल केले होते, परंतु त्याने सत्य लपवले होते, असा युक्तिवाद करण्यात आला. त्याच्यावरील प्रारंभिक हल्ल्याची कबुली देण्याऐवजी त्याने त्याला जखम झाल्यानंतर छत्रीचा वापर करण्यात आला होता, असे सुचवत त्याने आत्मरक्षणार्थ त्याचा वापर केल्याचे सुचवले होते. या संदर्भात जोर दिला गेला की, घटनास्थळी तपास अधिकाऱ्यांना तुटलेली छत्री आढळून आली होती. या परिस्थितीतून पडतेने अपीलकर्त्याला छत्रीने बराच जोराने मारले असावे असा अंदाज बांधण्यात आला आणि ते त्याला जखम होण्यापूर्वीच केले जाऊ शकते. सहा विरोधी लोकांचा सामना करत असताना आरोपीने जोरदार मार खाऊनही चाकूचा वापर केला, तो आत्मरक्षा करण्याचा त्याचा कायदेशीर आणि वैध अधिकार होता, असे वकीलांचे म्हणणे होते.

हे खरे आहे की, आरोपी व्यक्ती आत्मरक्षेच्या समर्थनात बचाव पुरावा न देताही, हे दाखवण्यासाठी की त्याने सदर कृती आत्मसंरक्षणासाठी केली आहे. अभियोगाने सादर केलेल्या

पुराव्यावर आणि अभिलेखावर अवलंबून राहू शकतो. अशा प्रकरणांमध्ये, न्यायालयाला ठरवण्यास सांगितले जाणारे खरे प्रश्न म्हणजे पुराव्याचे आणि अभिलेखावरील संबंधित पुराव्याचे योग्य मूल्यांकन केल्यानंतर असे म्हणता येते की आरोपीच दोषी आहे ही बाब नि:संशयपणे सिद्ध झाली आहे. फक्त आरोपीने कोणत्यातरी कारणास्तव किंवा दुसऱ्या कारणांमुळे असा जबाब देण्यास टाळाटाळ केली म्हणून आत्मसंरक्षणाचा हक्क सिद्ध करणाऱ्या पुराव्याकडे न्यायालय दुर्लक्ष करूच शकत नाही. पुरावा आणि अभिलेखावरील पुरावे तपासल्यानंतर, तथापि, आरोपीने आत्मसंरक्षणासाठी कृती करताना अभियोगाच्या साक्षीदारांना जखमा केल्या असल्याचे आम्हाला म्हणता येत नाही. आरोपीच्या अंगावरील जखमांची डॉ. व्ही. बी. नायर, अपघात वैद्यकीय अधिकारी, यांनी चॅरिटेबल नायर हॉस्पिटल येथे २२ जून १९६६ रोजी सायंकाळी ५ वाजता तपासणी केल्यानंतर उजव्या स्कॅप्युलर प्रदेशावर १/२" x १/४" त्वचा खोल आणि दोन खरचटल्याच्या जखमा (उजव्या हाताच्या बोटावर खरचटणे आणि डाव्या कोपरावरील रेषेतील खरचटणे) अशा असल्याचे आढळून आले. उजव्या खांद्याजवळील प्रदेशावरील जखम दाखवते की ती आरोपीला पाठीमागून मारहाण केल्याने झाली आणि तसे असेल तर, न्यायचौकशी न्यायालयाने सुचवल्याप्रमाणे, आरोपीने चाकूचा खुला वापर केल्यानंतर झालेल्या हाणामारीत, फिर्यादीचा साक्षीदाराला चाकूने जखमी केल्यानंतर तो पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना कुणीतरी त्याला छत्रीने मारले असावे. पडते यांनी सांगितल्याप्रमाणे तो धक्का देऊन झालेला नसावा. या मुद्द्यावर स्पष्ट पुरावा नसल्याने न्यायालयाला शक्यतांनुसार ठरवावे लागेल. या दृष्टीकोनातून, आरोपीला प्रथम छत्रीने मारहाण करण्यात आली होती असा आरोपीचा आरोप आम्हाला कायम ठेवता येत नाही. आरोपीला पडतेने चाकूने धमकी दिल्यानंतर त्याने तो चाकू हिसकावण्याचा प्रयत्न केला आणि या झटापटीदरम्यान पडतेला आरोपीने ढकलताना पोटात अपघाताने जखम झाली असावी हा दुसरा युक्तिवाद फक्त नाकारण्यासाठी मांडायचा आहे. ही कहाणी नुसतीच अवास्तव वाटत नाही तर आम्हाला ती स्वीकारण्यासाठी नोंदवरील कोणताही

तर्कसंगत आधारही सापडत नाही. डॉ. विजेंद्र जे. शंकर (सरकारी साक्षीदार क्र. ११) यांनी वर्णन केल्याप्रमाणे पोटातील चाकूच्या जखमेचे स्वरूपही हा अंदाज नकारात्मक करते. जखम पोटाच्या पोकळीत झाली आहे आणि आतडे हे दिसत होते आणि बाहेर येत होते. झटापटीचे स्वरूप लक्षात घेता ते अपघाती होऊ शकत नाही. या सिद्धांताच्या समर्थनार्थ आरोपीच्या वकीलांनी दाखवलेल्या आरोपीच्या बोटावरील खरचटणे देखील तितकेच उपयोगी नाही; दुसऱ्या हल्ला करणाऱ्या व्यक्तीच्या हातातून खुला चाकू हिसकावण्यासाठी झालेल्या झटापटीत केवळ खरचटण्यापेक्षा जास्त गंभीर जखमा अपेक्षित असतात. त्यामुळे स्वसंरक्षणाच्या अधिकाराची सबब अमान्य करावी लागेल.

नंतर असा युक्तिवाद करण्यात आला की, अभियोगाच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ न्यायचौकशी न्यायालयाने अभियोगाच्या खटल्यात दिलेल्या आणि नंतर त्यांनी न्यायचौकशीमध्ये नाकारलेल्या तीन साक्षीदारांच्या (सरकारी साक्षीदार क्र. ४, ५ आणि ६) जबाबांवर कारवाई करू नये आणि सरकारी साक्षीदार क्र. ८ जो अभियोगाच्या खटल्यातील जबाबातून माघार घेतली नाही तो एक अत्यंत हितेसंबंध साक्षीदार आहे आणि म्हणूनच त्याचा पुरावा पूर्णपणे स्वीकारण्यात येऊ नये, असा युक्तिवाद वकीलांनी केला. अभियोगाच्या खटल्यात तपासणी न करता खटल्यात सादर करण्यात आलेले निंबाळकर (सरकारी साक्षीदार क्र. ३) यांनाही फितूर घोषित करण्यात आले आणि अभियोक्त्याद्वारे त्यांची उलटतपासणी करण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यांचा पुरावा, आरोपीच्या वकीलांच्या मते, अधिक चांगला नाही आणि म्हणूनच अभियोगाच्या खटल्याला बळ देत नाही. त्यामुळे, या न्यायालयाने अभिलेखावरील पुरावा विश्वसनीय नाही आणि तो आरोपीचा दोष नि: संशयपणे कोणतीही सिद्ध करत नाही असा निष्कर्ष काढला पाहिजे. आम्हाला हा युक्तिवाद पटला नाही. अभियोगाच्या खटल्यातील तीन साक्षीदारांचे जबाब, ज्यापासून ते न्यायचौकशीमध्ये फितूर झाले आणि जे अभियोगाच्या न्यायालयाच्या अभिलेखावर रितसर आणण्यात आले होते त्या कलम २८८, दंड प्रक्रिया संहिते अंतर्गत, मूलभूत पुरावे आहेत

आणि ते विधान खरे होते तर खटल्याच्या न्यायालयात दिलेले विधान खोटे होते असे न्यायालयाचे समाधान झाले तर तर आरोपीला दोषी ठरवण्यासाठी पूर्वीच्या जबाबावर सुरक्षितपणे अवलंबून रहावे लागेल. या प्रकरणात खटल्यातील जबाबांचे केवळ वाचन त्यांच्या अविश्वसनीय स्वरूपाचे दर्शन घडवते आणि साक्षीदारांनी त्यांच्या पूर्वीच्या जबाबांमधून माघार हे काही दुराचारी उद्दिष्ट होते हे स्पष्ट दिसते. त्यामुळे, भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६ आणि ३२४ अंतर्गत गुन्ह्यांसाठी आरोपीला दोषी ठरविण्याचा न्यायचौकशी न्यायालयाचा निर्णय बरोबर आहे यावर आम्ही समाधानी आहोत.

मात्र, शिक्षेच्या बाबतीत, आम्हाला असे वाटते की, घटनेस कारणीभूत ठरलेल्या व्यवहारांचे काहीसे संदिग्ध स्वरूप आणि आरोपीच्या घरी फिर्यादीचे साक्षीदारच्या सतत भेटींमुळे आरोपीची काही प्रमाणात चिडचीड झाली होती आणि त्याच्या आईच्या उपस्थितीत अप्रिय घटना झाली होती, या वस्तुस्थितीस अनुसरून आरोपीला दिलेली शिक्षा काहीशी कडक आहे. आमच्या मते, दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा न्यायाच्या उद्दिष्टांना अनुकूल ठरेल. हे न्यायालय सामान्यतः अनुच्छेद १३६ अंतर्गत अपीलवरील शिक्षेच्या प्रमाणात हस्तक्षेप करीत नाही, परंतु या प्रकरणात, आमच्या मते उच्च न्यायालयाने, कारण न देता अपील सारांशात फेटाळले असल्याने, आम्ही सर्व संबंधित परिस्थितींचा विचार करून स्वतः हा प्रश्न हाताळण्याचे निवडले आहे.

आरोपी आपली उर्वरित शिक्षा भोगण्यासाठी त्याच्या जामीनपत्रानुसार समर्पित होईल.

अपील अमान्य करण्यात येत आहे.

आर. के. पी. एस.

<u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्यामातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

***********